# रयत शिक्षण संस्थेचे,

# आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर(बुर्ली )

## सांस्कृतिक विभाग

### आद्यक्रांतीवीर नरवीर उमाजी नाईक जयंतीनिमित्त अभिवादन...!

रयत शिक्षण संस्थेचे ,आर्टस,सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर(बुर्ली)या कॉलेजमध्ये आद्यक्रांतीवीर नरवीर उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

'राजे उमाजी नाईक (जन्म: ७ सप्टेंबर १७९१ - मृत्यू: ३ फेब्रुवारी १८३२) हे भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ब्रिटिशांविरुद्ध लढणारे महाराष्ट्रातील प्रथम आद्यक्रांतिकारक होते.क्रांतिकारकांचा आदर आणि त्यांचे स्मरण सर्वच जातिधर्मातील लोकांनी केले पाहिजे.मग हे राजे उमाजी नाईक असे उपेक्षित का राहून गेले हे आश्चर्य आहे. “मरावे परि कीर्तीरूपे उरावे” अशी उक्ती आहे ती आद्यक्रांतीकारक राजे उमाजी नाईक यांच्याबद्दल तंतोतंत जुळते. ते स्वतःच्या कार्याने एक दीपस्तंभ ठरले आहेत.त्यांचा गौरव करण्यापासून इंग्रज अधिकारीही स्वतःला रोखू शकले नाहीत. असे मत कॉलेज चे प्राचार्य डॉ.एल.डी.कदम यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

यावेळी राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उपप्राचार्य डॉ. के.बी.भोसले,प्रा.नितीन कुंभार,सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.प्रतिभा पुदाले,प्रा.दिलीप कोणे, प्रा.आर.व्ही.वाघमारे,प्रा.स्नेहा वाघ,प्रा.प्रियांका जिरगे ,श्री.सुहास सौदाडे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यावेळी उपस्थित होत. शासकीय नियमानुसार कोरोना महामारीमुळे सामजिक अंतर (social distancing) या नियमाचेपालन करून व मास्क वापरून प्रतिमा पूजन करण्यात आले.

निष्पत्ती : 1. आद्याक्रांतीवीर नरवीर उमाजी नाईक यांच्या कार्याची माहिती समजली .

लाभार्थी : महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षक व शिक्षेकतर कर्मचारी.







आद्याक्रांतीवीर नरवीर उमाजी राजे नाईक यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करताना महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य व सर्व सहकारी प्राध्यापक

प्रा. प्रतिभा पुदाले
चेअरमन,
सांस्कृतिक विभाग

प्राचार्य,
आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)